दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड महाराष्ट्र | सोमवार, 17 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 100 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

WEBSITE : ATULYMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# परळीचे पशुवैद्यकीय महाविद्यालय मराठवाड्याच्या प्रगतीची नवी पायाभरणी ठरेल : ना. सुनेत्राताई पवार

## पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचे शानदार समारंभात भूमिपूजन

## परळीचा सकारात्मक बदल व भावी पिढीचे भविष्य उज्ज्वल करता येतेय याचा आनंद : ना पंकजाताई मुंडे

## महाविद्यालयाला स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे नाव द्यावे": धनंजय मुंडे

■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

मराठवाडा ही संतांची संस्कृतीची आणि कष्टकऱ्यांची भूमी आहे. शेतीला आधार देणाऱ्या पशुधनाची काळजी घेणे ही आजच्या काळाची गरज आहे. परळीत उभे राहणारे हे महाविद्यालय मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाच्या पशुवैद्यकीय शिक्षणाचे मोठे केंद्र ठरेल. या दृष्टीने मराठवाड्याच्या प्रगतीची ही नवी पायाभरणी असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई अजित पवार यांनी केले.समृद्ध शेतकरी, सुदृढ पशुपालन आणि पशुसंवर्धनातून स्वावलंबी उद्योजक युवक घडणार असून त्या दृष्टिकोनातून शासन प्रयत्नशील असल्याचे पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले. तर बारामती येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयाला अजित दादा पवार यांचे तर परळीतील पशुवैद्यकीय महाविद्यालयाला लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे नाव द्यावे अशी मागणी आ. धनंजय मुंडे यांनी आज येथे केली.

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांच्या दूरदृष्टीतून निर्माण होत असलेल्या परळी वैजनाथ येथील ६३४ कोटी रुपये खर्चाच्या पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचा कोनशिला समारंभ व भूमिपूजनाचा शानदार सोहळा आज मोठया थाटात संपन्न झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या.

स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी प्रचंड जनसागराच्या उपस्थित व उत्साहपूर्ण वातावरणात पालकमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्या शुभहस्ते व ना. पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली हे भूमिपूजन पार पडले. करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे, माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, आ. नमिता मुंदडा, माजी आमदार संजय दौंड, बदामराव पंडित, नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी, पशु वैद्यक विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन विभागाचे सचिव डॉ. एन. रामास्वामी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतीन रहेमान, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अक्षय मुंदडा आदी मान्यवर उपस्थित होते.








### प्रगतीची नवी पायाभरणी

■ यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी सांगितले की, बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे जे स्वप्न अजितदादांनी बघितले हे पूर्णत्वास घेऊन जाण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे. मराठवाडा हा कष्टकऱ्यांचा प्रदेश आहे, शेतीला आधार देणाऱ्या पशुधनाची काळजी घेणे ही आजच्या काळाची गरज आहे. परळीत उभे राहणारे हे महाविद्यालय मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी उच्च दर्जाच्या पशुवैद्यकीय शिक्षणाचे मोठे केंद्र ठरेल. या महाविद्यालयात अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, सुसज्ज प्रयोगशाळा, संशोधन केंद्र, वसतिगृह आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. परळीच्या आसपासच्या ५० ते १०० गावांतील पशुधनावर आधुनिक उपचारांची सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होईल. दूध उत्पादन वाढविणे, शेळीपालन अधिक फायदेशीर करणे तसेच पशुपालनाशी संबंधित विविध विषयांवर संशोधन केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.या महाविद्यालयातून केवळ नोकरी शोधणारे डॉक्टर तयार होऊ नयेत, तर पेट केअर क्लिनिक, डेअरी सल्लागार सेवा, पशुखाद्य निर्मिती आणि पशुपालनाशी संबंधित विविध क्षेत्रांत रोजगार निर्माण करणारे तरुण उद्योजक घडावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

### कृषी पाठोपाठ पशुवैद्यकीय महाविद्यालयामुळे राष्ट्रीय पातळीवर परळीचा लौकिक : आ.धनंजय मुंडे

■ या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचे पशुवैद्यकीय शिक्षण, संशोधन व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होण्याबरोबरच पशुपालक व शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीला मोठी चालना मिळणार आहे. या प्रकल्पाचे स्वागत करताना परळीमध्ये पशुवैद्यक महाविद्यालयाबरोबरच कृषी महाविद्यालयही आंतरराष्ट्रीय दर्जाचे होत असल्याबद्दल माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी आनंद व्यक्त केला. तसेच बारामती येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयाला अजितदादा पवार यांचे तर परळीतील पशुवैद्यकीय महाविद्यालयाला लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे नाव द्यावे अशी मागणी आ. धनंजय मुंडे यांनी केली. कार्यक्रमास मतदारसंघातील नागरिक, महिला तसेच भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मंत्रीपदाचा उपयोग परळीसाठी करता आला याचा आनंद : ना पंकजाताई मुंडे

■ बारामती येथील कृषी प्रदर्शनात अजितदादांनी या प्रकल्पाची घोषणा केली होती. या पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून परळी परिसरात मोठ्या प्रमाणावर विकासात्मक व सकारात्मक बदल घडणार आहेत. पशुपालकांना त्यांच्या व्यवसायासाठी मदत व्हावी यासाठी ५० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्याची शासनाची भूमिका आहे. पशुसंवर्धन खात्याची मंत्री म्हणून परळी व परिसरासाठी येणाऱ्या पिढ्यांचे उज्वल भविष्य घडावे या दृष्टिकोनातून आपल्याला काहीतरी करता येत असल्याचा मनोमन प्रचंड आनंद असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून महाराष्ट्रात मुख्यमंत्री पशुधन उद्योग योजना प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे.परळीतील या महत्त्वाकांक्षी प्रकल्पा मुळे या भागाच्या विकासाचा नवा अध्याय लिहला जात आहे. परळीच्या विकासाच्या दृष्टीने पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय हा महत्त्वाचा टप्पा आहे. शिक्षण, पशुसंवर्धन, संशोधन, रोजगार आणि शेतकरी-पशुपालकांच्या आर्थिक उन्नतीला या प्रकल्पामुळे नवी दिशा मिळणार आहे असे पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले. या पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे काम पूर्ण क्षमतेने निर्धारित वेळेत गुणवत्तेचे आणि दर्जेदार होण्याच्या दृष्टीने काम करावे असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.समृद्ध शेतकरी, सुदृढ पशुधन आणि स्वावलंबी मराठवाडा घडविण्याचा आपला संकल्प असल्याची वही त्यांनी यावेळी दिली.

---

## काँग्रेस नेत्यांकडून 'वंदे मातरम्' चा अवमान, निषेधार्थ; भाजयुमोचे आंदोलन, गांधी चौकात सामूहिक गायन

■ लातूर प्रतिनिधी

स्वातंत्र्य दिनानिमित्त काँग्रेस पक्षाच्या मुख्यालयात आयोजित कार्यक्रमा दरम्यान 'वंदे मातरम्' चे गायन सुरू असताना या राष्ट्रीय गीताचा काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांकडून अवमान करण्याचा प्रयत्न झाला या घटनेच्या निषेधार्थ भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात १६ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी आंदोलनासाठी काँग्रेस भवनकडे जाणाऱ्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी रोखून धरल्याने गांधी चौकातच निषेध आंदोलन करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने १ ऑक्टोबर २०२५ रोजी 'वंदे मातरम्' च्या १५० व्या वर्षानिमित्त राष्ट्रव्यापी कार्यक्रमांना मंजुरी दिली. स्वातंत्र्य लढ्यातील 'वंदे मातरम्' चे योगदान नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे, देशभक्तीची भावना दृढ करणे आणि राष्ट्रीय एकात्मता मजबूत करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

गौरवशाली स्वातंत्र्य लढ्याची प्रेरणा आणि राष्ट्रभावना जागृत ठेवण्याचा हा प्रयत्न असल्याने संपूर्ण देशभर १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहणापूर्वी वंदे मातरम हे राष्ट्रीय गीत गायले. काँग्रेसच्या मुख्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमा दरम्यान वंदे मातरम गायन सुरू असताना काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्याकडून अवमान करण्याचा प्रयत्न झाला या घटनेच्या निषेधार्थ भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस भवन समोर आंदोलन करण्यासाठी जात असताना भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी गांधी चौकातच अडविले.

शांततामय आंदोलन करण्याचे ठरल्याने नाईलाजास्तव लातूर येथील गांधी चौकात भारत माता की जय, वंदे मातरम, सोनिया गांधी हाय हाय, राहुल गांधी हाय हाय अशा घोषणा देऊन भारतीय जनता युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांना निषेध आंदोलन करावे लागले. सामूहिक वंदे मातरम गायनाने या आंदोलनाचा समारोप करण्यात आला. आंदोलना दरम्यान गांधी चौकात पोलिसाचा मोठा फौज फाटा होता. या आंदोलनात भारतीय जनता पार्टी आणि युवा मोर्चाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## भाविकांच्या स्वागतासाठी प्रभू वैद्यनाथ मंदिर सज्ज!

### आकर्षक सजावट अन् विद्युत रोषणाईने उजळली वैद्यनाथ नगरी

■ परळी वैजनाथ नितीन ढाकणे


परळी वैजनाथ येथील प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी यंदाच्या श्रावण महिन्यात मोठी आणि आनंदाची बातमी आहे. भाविकांच्या सेवेसाठी वैद्यनाथ देवस्थान कमिटीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत मेरुगिरी परिसरातील देवस्थानचे यात्री निवास मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे.

यामुळे बाहेरगावाहून प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी परळीत येणाऱ्या भाविकांना आता मोफत निवासासोबतच मोफत भोजनाची सुविधाही मिळणार आहे. श्रावण महिन्यात देशभरातून मोठ्या संख्येने भाविक परळीमध्ये दाखल होत असतात. या काळात भाविकांच्या निवासाचा प्रश्न निर्माण होतो. हीच बाब लक्षात घेऊन देवस्थान कमिटी आणि विश्वस्त मंडळाने हा निर्णय घेतला आहे. मेरुगिरीच्या रांगांमध्ये, वैद्यनाथ मंदिरापासून जवळच निसर्गरम्य परिसरात हे यात्री निवास आहे. या ठिकाणी तब्बल अडीच ते तीन हजार भाविकांच्या निवासाची क्षमता असल्याची माहिती आहे. सध्या यात्री निवासाच्या ठिकाणी रंगरंगोटी तसेच भाविकांसाठी आवश्यक सुविधांची कामे सुरू आहेत. ही कामे पूर्ण झाल्यानंतर येत्या चार ते पाच दिवसांत हे यात्री निवास भाविकांच्या सेवेत दाखल होणार आहे.

विशेष म्हणजे, वैद्यनाथ मंदिरात बाहेरगावच्या भाविकांसाठी देवस्थानच्या वतीने यापूर्वीपासूनच मोफत अन्नछत्राची सुविधा उपलब्ध आहे. आता त्यासोबत मोफत निवासाची सुविधा मिळणार असल्याने हजारो भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे. वैद्यनाथ देवस्थानकडे सध्या एकूण चार भक्तनिवास आहेत. याशिवाय ८५ खोल्यांचे आणखी एक भव्य भक्तनिवास तयार करण्यात आले असून, तेही लवकरच भाविकांच्या सेवेत दाखल होणार आहे. त्यामुळे भविष्यात परळीला येणाऱ्या भाविकांसाठी निवासाची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे.

या संदर्भात वैद्यनाथ देवस्थान कमिटीचे सचिव राजेश देशमुख यांनी माहिती दिली आहे. दरम्यान, श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर अनन्यसाधारण महत्त्व असलेले प्रभू वैद्यनाथ मंदिरही भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाले आहे. मंदिर परिसरात करण्यात आलेली विलोभनीय सजावट आणि आकर्षक विद्युत रोषणाई भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे. भाविकांच्या सेवेला प्राधान्य देत वैद्यनाथ देवस्थानने घेतलेल्या या निर्णयामुळे यंदाच्या श्रावणात परळीत दाखल होणाऱ्या हजारो भाविकांना मोठा दिलासा मिळणार आहे.





# संपादकीय

## निसर्गाचा कोप की मानवी लोभ?

निसर्गाचे बदलते रूप केवळ 'ग्लोबल वॉर्मिंग'चे अपत्य नाही, तर ते आपण विकासाच्या नावाखाली केलेल्या पर्यावरणाच्या कत्तलीचे आणि नियोजनाच्या नावाने चालवलेल्या अनागोंदीचे थेट फलित आहे. मुंबई, पुणे, बंगळुरूसारखी महानगरे पाण्याखाली जाणे, सह्याद्रीचा कणा ढासळणे ही आता नैसर्गिक नव्हे, तर मानवनिर्मित आपत्ती बनली आहे.

पर्जन्यराजाचे आगमन झाले, की एके काळी बळीराजाच्या डोळ्यात कृतज्ञतेचे प्रबोधन व्हायचे आणि चाकरमान्यांच्या मनात आनंदाचे तरंग उमटायचे; पण आज परिस्थिती बदलली आहे. आता मॉन्सून येतो तो 'आनंद' घेऊन नाही, तर 'धडकी' भरवून... हवामान विभागाने जाहीर केलेल्या देशाच्या मॉन्सून नकाशावर नजर टाकली, तर संपूर्ण देश एका विचित्र हवामान विसंगतीच्या विळख्यात अडकलेला दिसतो. कुठे कोरडा दुष्काळ तर कुठे जलप्रलय! 'अल-निनो'च्या प्रभावामुळे यंदा मॉन्सून सुरुवातीला रेंगाळला, देशातील बहुतांश राज्ये कोरडी राहिली, तर दुसरीकडे अवघ्या काही दिवसांमध्ये ढगफुटीसदृश पाऊस पडून शहरांची आणि नद्यांची दुरवस्था झाली. आज देशातील प्रत्येक मोठे शहर पहिल्याच मुसळधार पावसात 'बेटा'चे स्वरूप धारण करते. शहरे का तुंबतात, या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी फार मोठ्या तज्ज्ञांची गरज नाही. याचे मूळ आपल्या चुकीच्या नागरीकरणात आणि कॉँक्रीटीकरणाच्या अघोरी हव्यासात दडलेले आहे. गेल्या काही दशकांमध्ये आपण शहरांमधील मातीचा प्रत्येक तुकडा सिमेंट आणि डांबराने गाडून टाकला आहे. पूर्वी पडणारा पाऊस जमिनीमध्ये जिरायचा. त्यामुळे भूजल पातळी वाढायची आणि पाण्याचा प्रवाह संथ व्हायचा. आज शहरांमध्ये माती उरलीच नसल्यामुळे पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब थेट रस्त्यावर येतो. कॉँक्रीटीकरणामुळे पाण्याचा नैसर्गिक निचराच पूर्णपणे बंद झाला आहे. त्यात भर पडली आहे ती आपल्या निकृष्ट ड्रेनेज सिस्टीमची. ब्रिटिश काळात किंवा त्यापूर्वी बांधलेल्या वाहिन्यांवर आज कोट्यवधींच्या लोकसंख्येचा आणि सिमेंटच्या जंगलाचा भार टाकला जात आहे. परिणामी, पुढील आक्रीत ओढवते.

कचरा, प्लास्टिक आणि गाळाने तुंबलेले नाले आणि गटारे एवढ्या प्रचंड पाण्याचा भार पेलू शकत नाहीत. परिणामी, रस्ते हेच नद्या बनतात आणि चकचकीत महानगरे काही तासांमध्येच दलदलीत रूपांतरित होतात. बंगळुरू आणि पुणे ही देशातील 'आयटी हब' आणि शिक्षणाची माहेरघरे म्हणून ओळखली जाणारी शहरे आज पूरपरिस्थितीचे सर्वात मोठे बळी ठरत आहेत. बिल्डर लॉबी आणि भ्रष्ट प्रशासकीय यंत्रणेने मिळून शहरांचा गळा घोटला आहे. पुणे असो वा बंगळुरू; इथे नैसर्गिक ओढे, नाले आणि नद्यांच्या पूररेषा बुडवून टोलेजंग इमारती, 'आयटी पार्क' आणि गृहप्रकल्प उभे राहिले आहेत. बंगळुरूसारख्या शहरात पूर्वी शेकडो तलाव होते. ते एकमेकांशी नैसर्गिक नाल्यांनी जोडलेले होते. अतिरिक्त पाणी एका तलावातून दुसऱ्या तलावात वाहून जायचे. आज ते सर्व नाले आणि तलाव गिळंकृत करून त्यावर सिमेंटचे साम्राज्य उभे राहिले आहे. पुण्यातही बंगळुरूची पुनरावृत्ती झाली आहे. मुळा-मुठा नदीपात्रात झालेली अतिक्रमणे, रामनदी आणि इतर छोट्या ओढ्यांचे अस्तित्व मिटवून टाकल्यामुळे पावसाचे पाणी वाहून जायला जागाच उरलेली नाही.

यासंदर्भात मावळातून वाहणाऱ्या आणि पिंपरी-चिंचवड, पुण्याची तहान भागवणाऱ्या पवना नदीचे उदाहरण ताजे आहे. पवना नदीच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाला, की धरणातून विसर्ग करावा लागतो; मात्र नदीपात्र अरुंद झाल्यामुळे आणि पात्रातच राडारोडा, बांधकामे झाल्यामुळे हे पाणी आजूबाजूच्या नागरी वस्त्यांमध्ये शिरते. यंदा पवना नदीला आलेल्या पुरामुळे शेकडो कुटुंबांना आपले घरदार सोडून सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे लागले. देहू, आळंदी परिसरातून वाहणाऱ्या पवित्र इंद्रायणी नदीचा प्रकोपही यंदा संपूर्ण महाराष्ट्राने पाहिला. इंद्रायणी नदीला आलेल्या पुरामुळे केवळ शेतीचेच नुकसान झाले नाही, तर उद्योग आणि वाहतुकीचा कणा मोडला. पुणे-नाशिक महामार्गावर चाकण आणि आसपासच्या परिसरात तीन-चार फूट पाणी साचल्याने अलिकडेच वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. हा महामार्ग राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. इथे हजारो औद्योगिक कंपन्या आहेत; पण पाण्याचा निचरा होण्यासाठी महामार्गाच्या कडेला आवश्यक त्या वाहिन्याच तयार केल्या गेल्या नाहीत. आजूबाजूच्या टेकड्या आणि नैसर्गिक नाले बुजवून कंपन्या आणि व्यावसायिक गाळे उभारल्यामुळे महामार्गच एका मोठ्या धरणात रूपांतरित झाला. शहरांची ही अवस्था असताना, महाराष्ट्राचे कवच मानल्या जाणाऱ्या सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वेगळेच आणि अत्यंत भीतीदायक संकट उभे राहिले आहे. महाबळेश्वर, ताम्हिणी, माळशेज, वरंधा आणि आंबेनळी घाटात दर वर्षी होणाऱ्या भूस्खलनाच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. सह्याद्रीचा डोंगर खचत आहे, रस्ते वाहून जात आहेत आणि दरडी कोसळून निष्पाप लोकांचे बळी जात आहेत. माळीणच्या आठवणी अजून ताज्या असताना आता मावळात पाटणची घटना सुन्न करणारी ठरली. पर्यटन आणि विकासाच्या नावाखाली सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर चाललेली अंदाधुंद तोडफोड ही त्याची कारणे आहेत. रिसॉर्ट्स बांधण्यासाठी, रस्ते रुंदीकरणासाठी डोंगरांचे पायथे जेसीबी लावून उकरले जात आहेत.

डोंगरांना धरून ठेवणारी झाडे नष्ट केली जात आहेत. यामुळे डोंगराची माती सैल होते आणि मुसळधार पाऊस झाला, की ती थेट खाली कोसळते. सह्याद्रीच्या पर्यावरणाशी चाललेला हा खेळ केवळ घाटापुरता मर्यादित नसून, संपूर्ण किनारपट्टी आणि दख्खनच्या पठाराला धोक्यात आणणारा आहे. या संपूर्ण प्रलयात सर्वात मोठी शोकांतिका पुढेच आहे. एका बाजूला शहरे पाण्यात बुडत असताना 'सेंट्रल वॉटर कमिशन'च्या अहवालानुसार देशातील प्रमुख १६६ धरणांमध्ये केवळ २६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दक्षिण भारतात आणि महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये जलाशयांची पातळी सामान्यपेक्षा ४० ते ५० टक्क्यांनी खाली आहे. याचा अर्थ पडणारा पाऊस आपण साठवू शकत नाही. कमी कालावधीत जास्त पावसामुळे पाणी वेगाने वाहून जाते, महापूर येतो आणि पाणी समुद्राला मिळते नीती आयोग म्हणतो, की २०३० पर्यंत देशातील २१ मोठ्या शहरांमधील भूमिगत पाणी संपुष्टात येईल. आपण आज पडणारे पाणी जमिनीखाली जिरवू शकलो नाही, तर पावसाळ्यात पुराच्या पाण्यात बुडणारी हीच शहरे उन्हाळ्यात पाण्यासाठी टँकरच्या रांगेत उभी असलेली दिसतील. आपण आताच सुधारलो नाही, तर डॉ. इस्माइल सेरागेल्डिन यांनी वर्तवलेले भाकीत खरे ठरेल.

# परळीच्या पशुवैद्यक महाविद्यालयास स्व. गोपीनाथराव मुंडेंचे तर बारामतीच्या महाविद्यालयास स्व. अजितदादांचे नाव देणार

**धनंजय मुंडे यांची मागणी अन सुनेत्रा पवार, पंकजाताई यांची लगेच मान्यता!**

**शेतकऱ्यांची सेवा आणि संघर्ष आमच्या रक्तात : धनंजय मुंडे**

**मी आणि पंकजाताई स्व. मुंडे साहेबांच्या विकासरथाची दोन चाके, कधी एक पुढे एक मागे राहणारच : धनंजय मुंडे**

■ **परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी)**

पशु संवर्धन विभागाच्या वतीने आज राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आलेल्या पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयास स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे तर बारामती येथील पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयास स्व. अजितदादा पवार यांचे नाव देण्याची माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी मागणी करताच परळीच्या महाविद्यालयास स्व. मुंडे साहेबांचे नाव देण्यास सुनेत्रा पवार यांनी तर बारामती येथील महाविद्यालयास स्व. अजितदादा पवार यांचे नाव देण्यास पंकजाताई मुंडे यांनी मान्यता दिल्याचे आपापल्या भाषणात जाहीर केले!

पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नातून परळीत आज पशु संवर्धन विभागाच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या शासकीय पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय इमारतीचे कामाचा भूमिपूजन व कोनशिला अनावरण समारंभ उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी धनंजय मुंडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

सुनेत्रा वहिनी यांचा हा पहिलाच परळी दौरा असल्याने आपण आज त्यांना काही मागणार नाही, असे ठरवले होते मात्र महाविद्यालयाच्या नामकरणाचा प्रस्ताव मात्र मांडतो आहे, असे श्री मुंडे म्हणाले.

स्व. गोपीनाथराव मुंडे हे शेतकरी - कष्टकऱ्यांचे नेते होते, माझे वडील स्व. पंडित अण्णा हे स्वतः शेतकरी होते. त्यामुळे शेतकऱ्यांची सेवा ही आमच्या रक्तात आहे, या भावनेतूनच मी कृषी मंत्री असताना कृषी महाविद्यालय तसेच सोयाबीन संशोधन केंद्र सारख्या आस्थापना परळीत आणल्या.

परंतु परळीत या आस्थापना आणण्याआधी माझ्या मंत्री काळात देशी गायी संशोधन केंद्र पुण्यात तर पंकजाताईंनी पशुवैद्यक महाविद्यालय बारामती येथे अजितदादांच्या सूचनेवरून मंजूर केले होते. त्यामुळे आमचे बारामतीशी विकासाची देवाणघेवाण करण्याचे नाते असल्याचेही धनंजय मुंडे म्हणाले.



व्यासपीठावर उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार, मंत्री पंकजाताई मुंडे, आ. नमिता मुंदडा, नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, मा. आ. संजय दौंड, बदामराव पंडित, अजय मुंडे यांसह संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी आदी उपस्थित होते.

मी आणि पंकजाताई स्व. मुंडे साहेबांच्या विकासरथाची दोन चाके, कधी एक पुढे एक मागे राहणारच - धनंजय मुंडे स्व. मुंडे साहेब, पंकजाताई आणि मी, आमच्या वाट्याला कायम संघर्ष आला. पण जनसेवेच्या वाटेवर आम्ही कधीच माघार घेतली नाही. स्व. मुंडे साहेबांच्या विकास आणि प्रगतीच्या रथाचे मी व पंकजाताई दोन चाके आहोत, कधी एक पुढे तर दुसरे मागे आणि पुन्हा दुसरे पुढे तर पहिले मागे, हा क्रम सुरूच राहील मात्र विकासाची प्रक्रिया निरंतर सुरू राहील. नवनवीन विकास प्रकल्प परळीत येत राहणार, माध्यम मी असो किंवा पंकजाताई; विकास प्रक्रिया सुरू राहील, असेही धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना आवर्जून नमूद केले.

# सिरसाळ्यात पोलिसांकडून अमली पदार्थ विरोधी जनजागृती



■ **सिरसाळा / अतुल बडे**


येथील न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, सिरसाळा येथे आज 'गुटखा, तंबाखू व अंमली पदार्थ विरोधी व जनजागृती शिबीर' उत्साहात पार पडले. शाळेच्या प्रांगणात झालेल्या या कार्यक्रमात शेकडो विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून सिरसाळा ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संजयकुमार राठोड हे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी भागवत देशमुख व सुमंत देशमुख, सुशांत सोनवणे, भागवत हवेले, योगेश समुद्रे, उपस्थित होते.

उपनिरीक्षक राठोड यांनी विद्यार्थ्यांना गांजा, चरस व इतर अंमली पदार्थांची सविस्तर माहिती दिली. ड्रग्सच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकताना ते म्हणाले, अंमली पदार्थांचा शरीराच्या प्रत्येक अवयवावर परिणाम होतो. सर्वात प्रथम याचा परिणाम आपल्या मेंदूवर होतो. स्मरणशक्ती कमी होते, निर्णय घेण्याची क्षमता नष्ट होते, भ्रम होतात, नैराश्य येते आणि

त्यातूनच आत्महत्येचे विचार मनात येतात. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना पोक्सो कायदा आणि वाहतुकीच्या नियमांबाबतही जनजागृती केली. प्रास्ताविक प्राचार्य राठोड यांनी तर आभार प्रदर्शन एस.बी. शिंगणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# स्वरा मुंडे हिचे उत्कृष्ट भाषण

■ **रेणापूर (पोहेगाव)**



संस्कार प्राथमिक शाळेमध्ये भाषणाची संधी न मिळाल्यामुळे खचून न जाता, टोकवाडी येथील चिमुकली स्वरा सोमनाथ मुंडे हिने आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर रेणापूर तालुक्यातील पोहेगाव येथील 'माऊली इंग्लिश स्कूल'मध्ये जोरदार भाषण करून उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. टोकवाडी येथील रहिवासी असलेल्या स्वरा मुंडे हिला तिच्या स्वतःच्या संस्कार प्राथमिक शाळेत व्यासपीठावर भाषण करण्याची संधी मिळाली नव्हती. मात्र, यामुळे निराश न होता तिने पोहेगाव येथील माऊली इंग्लिश स्कूल गाठले.

# लातूर एमआयटी येथे उत्साहात स्वातंत्र्य दिन; प्राचार्य डॉ. जमादार यांच्या हस्ते ध्वजारोहण



■ **लातूर प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने माईर्स् एमआयटी वैद्यकीय शैक्षणीक संकुल, लातूर येथे शनिवार दि. १५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार यांच्या हस्ते मोठ्या उत्साहाच्या वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी लातूर एमआयटी शैक्षणिक संकुलातील कर्मचाऱ्यांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस अधिष्ठाता डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मोठ्या उत्साहाच्या आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी प्रशासकीय व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, रुग्णालय अधीक्षक डॉ. बी. बी. जाधव, रुग्णालय उपअधीक्षक डॉ. चंद्रकला पाटील, नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य सर्वाननसेना, दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यतिश जोशी, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. वैजनाथ डिगे, आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत चाटे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी लातूर एमआयटी शैक्षणिक संकुलातील प्राचार्य एस. एस. सर्वानन यांना उत्कृष्ट अध्यापक तर माणिक आघाव यांना उत्कृष्ट लिपिक पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. धन्वंतरी वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेच्या वतिने सभासद कर्मचाऱ्यांचे गुणवंत विद्यार्थी दाडगे प्रज्वल योगानंद, गुंमतापुरे प्रज्वल अशोक, घाडगे यश बाबुराव, कु. देशपांडे अनुष्का सी., इंगळे सृष्टी नीलकंठ, घुले मयूर दिलीपराव, शिंदे यश भरत, पवार प्रणव महेश्वर या गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषक देऊन यथोचित सत्कार करून अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. अरुणकुमार राव, डॉ. लक्ष्मण कस्तुरे, डॉ. एन. व्ही. कुलकर्णी, डॉ. बबन आडगावकर, डॉ. विद्या कांदे, डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. बी. बी. जाधव, डॉ. पठाण, डॉ. बी. एस. वारद, डॉ. शैला बांगड, डॉ. क्रांती केंद्रे, रुग्णालय प्रशासकीय अधिकारी श्रीपती मुंडे यांच्यासह एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय, एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, फिजीओथेरपी महाविद्यालय व नर्सिंग महाविद्यालयातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, डॉक्टर, विद्यार्थी, पालक व नागरीक ध्वजारोहण कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. सुरेश धस यांच्या पुढाकाराचा सकारात्मक परिणाम; महाआरोग्य शिबिरातून रुग्णांना नवजीवन

### शिरूर कासार तालुक्यातील वारणी येथील सुभाष केदार यांच्यावर ५ लाखांपर्यंतची मणक्याची शस्त्रक्रिया मोफत

■ **आष्टी (प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्यदूत आमदार सुरेश आण्णा धस यांच्या संकल्पनेतून ६ ऑगस्ट रोजी आष्टी येथे आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराचा सकारात्मक परिणाम आता प्रत्यक्ष रुग्णांच्या जीवनावर दिसून येत आहे. शिबिरात तपासणी करून निवड झालेल्या गरजू रुग्णांवर विविध रुग्णालयांत मोफत उपचार व शस्त्रक्रिया करण्यात येत आहेत. याच उपक्रमातून शिरूर कासार तालुक्यातील वारणी येथील सुभाष देवराव केदार यांच्यावर अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये मणक्याच्या गादीची शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात आली.



वारणी येथील सुभाष केदार हे महाआरोग्य शिबिरासाठी आले असता त्यांच्या आजाराची तातडीने दखल घेण्यात आली. कार्यकर्ते श्रीराम केदार यांनी त्यांच्या उपचाराबाबत आमदार सुरेश धस यांच्याकडे माहिती दिल्यानंतर त्यांनी तात्काळ आवश्यक मदत व उपचाराची व्यवस्था करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार सुभाष केदार यांना १० ऑगस्ट २०२६ रोजी अहिल्यानगर येथील साईदीप हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांच्यावर मणक्याच्या गादीची शस्त्रक्रिया करण्यात आली आणि उपचारानंतर १५ ऑगस्ट रोजी त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला.

या उपचारासाठी अंदाजे ४ लाख ५० हजार ते ५ लाख रुपये खर्च अपेक्षित होता. मात्र आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत संपूर्ण उपचाराचा खर्च झाल्याने केदार कुटुंबावर कोणताही आर्थिक भार पडला नाही. विशेष म्हणजे रुग्णालयातील नोंदणीसाठी भरलेली ५५० रुपयांची फी देखील परत करण्यात आली. त्यामुळे महागडी शस्त्रक्रिया होऊनही सुभाष केदार यांना उपचारासाठी अक्षरशः एक रुपयाही खर्च करावा लागला नाही.

### महाआरोग्य शिबिरातून आणखी दोन रुग्णांवर गुडघा सांधेरोपणाच्या शस्त्रक्रिया

आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून आयोजित महाआरोग्य शिबिरात निवड झालेल्या आणखी दोन गरजू रुग्णांवर अहिल्यानगर येथील साईदीप सह्याद्री रुग्णालयात गुडघा सांधेरोपणाच्या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या.

आष्टी तालुक्यातील कर्हेवडगाव येथील गोपीनाथ मारुती सानप आणि पाटोदा तालुक्यातील नफरवाडी येथील महादेव नरसिंग चव्हाण यांच्यावर गुडघ्याच्या मोफत शस्त्रक्रिया यशस्वीपणे करण्यात आल्या. साईदीप सह्याद्री रुग्णालयाचे चेअरमन डॉ. दीपक किरण यांच्या सहकार्याने डॉ. नालकर यांनी या शस्त्रक्रिया केल्या.

शस्त्रक्रियेनंतर सानप व चव्हाण यांनी आमदार सुरेश धस, डॉ. दीपक किरण, डॉ. नालकर तसेच उपचारासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले. "आता आम्ही पुन्हा स्वतःच्या पायावर उभे राहू शकतो," अशी भावना व्यक्त करत त्यांनी महाआरोग्य शिबिराबद्दल समाधान व्यक्त केले. रुग्णसेवक विकास साळवे व अमर वाळके यांनीही उपचार प्रक्रियेत मदत केली.

### आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी आ.सुरेश धस ठरताहेत आधार

आष्टी विधानसभा मतदारसंघातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना महागड्या उपचारांसाठी आयुष्यमान भारत योजना, मुख्यमंत्री सहायता निधी तसेच इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून मदत मिळवून देण्यासाठी आमदार सुरेश धस यांचा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरत आहे. आष्टीतील महाआरोग्य शिबिरात केवळ तपासणी न करता गंभीर आजार असलेल्या गरजू रुग्णांची निवड करून त्यांच्या पुढील उपचार व शस्त्रक्रियांची व्यवस्था केली जात असल्याने या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. "महाआरोग्य शिबिर हे केवळ एक दिवसाचे शिबिर न राहता गरजू रुग्णांना प्रत्यक्ष उपचार मिळवून देणारे अभियान ठरत आहे," अशी भावना रुग्णांच्या नातेवाईकांकडून व्यक्त होत आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# पुन्हा बांधूया का ? एक झोका ?



श्रावण महिन्यातला पहिला सण म्हणजे नागपंचमी....नागपंचमी आली की मन आपोआपच आपल्या त्या जुन्या दिवसांत जाऊन बसतं... देऊळगाव घाट, ता. आष्टी, जि. बीड... गाव तसंच आहे, पण तेव्हाचा गावपणाचा रंग आता कुठं दिसत नाही. आठवणी मात्र अजून ताज्या हायेत.आमच्या लहानपणी नागपंचमी म्हटलं की शाळेला सुट्टी असायची. सण आणि शाळेला सुट्टी म्हणजे दुग्ध शर्करा चा योग आसायचा. आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक,मराठी शाळेच्या ग्राउंडवर एक मोठ्ठं पिंपरीचं झाड होतं. त्या झाडाला गावातील मुलांचे झोके बांधलेले असायचे. सकाळपासून लेकरं तिथं जमायची. कुणी झोका घ्यायचं, कुणी झोका ढकलायचं, कुणी खाली उभं राहून गाणी म्हणायचं... दिवसभर नुसता धिंगाणा.....!

झोका वर गेला की वाटायचं, आपण आभाळाला हात लावतोय... तेव्हा ना आमच्याकडे ना मोबाईल..., ना आमच्याकडे टीव्ही..., ना आमच्याकडे कसली चिंता... फक्त मोकळं रान, गावची पोरं आणि मनसोक्त खेळणं...!

संध्याकाळ झाली की गावातल्या सगळ्या बाया एकत्र व्हायच्या. हातात पूजा-सामान घेऊन गावाच्या बाहेर भट्टीपाशीच्या वारुळाला जायच्या. वारुळाची पूजा व्हायची, लाह्या वाहिल्या जायच्या. आम्ही लेकरं पण त्यांच्या मागं-मागं जायचो. वारुळाला पाया पडून त्या लाह्या प्रसाद म्हणून घ्यायचो. त्या लाह्यांची चव आजच्या कितीही पदार्थात मिळणार नाही. दुसऱ्या दिवशी तर गावात वेगळाच उत्साह असायचा. मातीचा सख्रोबा गावातून निघायचा. सगळं गाव एकत्र जमायचं. कुणी पुढं, कुणी मागं... लेकरं नुसती धावत असायची. महिला मंडळाच्या बाया पंचमीची गाणी म्हणायच्या. त्यांच्या गाणी आणि आवाजानं सगळं गाव दुमदुमून जायचं...काय दिवस होते ते!सण म्हणजे सगळं गाव एकत्र.....

आनंद म्हणजे सगळ्यांचा आनंद.

आणि गाव म्हणजे खरंच एक मोठं कुटुंब....!आता काळ बदलला.... शाळेला सुट्टी असली तरी लेकरं झोक्यावर दिसत नाहीत.... मोबाईल मध्ये डोकं घालताना दिसतात.... जिल्हा परिषद मराठी शाळेच्या पिंपरीच्या झाडाखाली तो गोंधळ नाही. कारण आता त्या शाळेमध्ये ती पण रिचार्ज राहिला नाही. पंचमीची गाणी नाहीत. सख्रोबाची ती गावभरची मिरवणूक नाही. नव्या साड्या नेसून गावात मिरवणाऱ्या नव्या नवरीही आता दिसत नाहीत.सगळं आहे... पण तेव्हासारखं काहीच नाही.कधी कधी वाटतं, पुन्हा एकदा त्या पिंपरीच्या झाडाला झोका बांधावा... गावच्या लेकरांना एकत्र बोलवावं...पुन्हा पंचमीची गाणी म्हणावी...वारुळाला लाह्या वाहाव्यात...आणि दोन घटका का होईना, आपलं ते हरवलेलं बालपण पुन्हा जगावं!...

कारण काही आठवणी अशा असतात की,त्या आठवल्या की डोळ्यांत पाणी येतं, आणि ओठांवर हसू येतं....आमच्या देऊळगाव घाट च्या नागपंचमीच्या त्या आठवणीही अगदी तशाच हायेत... जुन्या, गावरान, साध्या... पण काळजात कायमच्या घर करून बसलेल्या!...

नागपंचमीच्या सगळ्यांना मनापासून शुभेच्छा!..

- आदिनाथ माणिक ठोंबरे
देऊळगाव घाट, ता. आष्टी, जि. बीड

# तीन वर्षानंतर ही खैरेखुर्द शाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय सोडविण्यास शासनाचे अपयश!








**- राजिप च्या सीईओ आणि शिक्षणाधिकारी एक वेळेस तरी खैरेखुर्द शाळे ची पाहणी करतील का- पालकवर्ग**
**- शाळेच्या ईमारतीचे स्ट्रक्चर ऑडिट विना केलेल्या तोडफोडी विरुद्ध कारवाई ची मागणी**

रोहा | प्रतिनिधी

रोहा:तालुक्यातील खैरेखुर्द येथील राजिप प्राथमिक उर्दु शाळेत जुलै २०२३ पासून विद्यार्थ्यांची गैरसोय सोडविण्यास शासन अपयशी ठरत आसल्याचे स्पष्ट दिसत आसुन शाळेच्या ईमारतीचे स्ट्रक्चर ऑडिट न करता केलेल्या तोडफोडी विरुद्ध चौकशीअंत संबंधितांवर कारवाई होणे आवश्यक आसल्याने राजिप च्या सीईओ मॅडम आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडून एक वेळेस तरी खैरेखुर्द शाळे च्या नादुरुस्त इमारतीची पाहणी करण्याची मांगणी पालकवर्ग आणि ग्रामस्थांकडून होत आहे...

सदर शाळेच्या चार वर्ग खोलींच्या ईमारतीचे नवीन बांधकामास सुमारे २० वर्ष पुर्ण होत आसुन सदर ची इमारत जुलै २०२३ साल च्या वादळात नादुरुस्त झाल्याने स्थानिक प्रशासन आणि शिक्षण विभागाकडून सदर च्या इमारतीत विद्यार्थ्यांना न बसवण्याचे आदेश शाळा व्यवस्थापन समितीला देण्यात आले होते.

सदर शाळेच्या नादुरुस्त इमारतीचे स्ट्रक्चर ऑडिट नुसार दुरुस्त किवा नवीन इमारत बांधून विद्यार्थ्यांची बसण्याची गैरसोय दूर करण्याची मागणी खैरेखुर्द च्या शाळा व्यवस्थापन समितीकडून करण्यात आली होती, आसे आसतानाच सन:२०२४ च्या मे महिन्यातील सुट्टी च्या दिवसात शाळेच्या इमारतीचे स्ट्रक्चर ऑडिट न करता बेकायदेशीरपणे सदर इमातीची तोडफोड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक, दर्जेदार शिक्षण उपलब्ध करुन देण्यासोबतच शाळेमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे, तसेच शाळेच्या नादुरुस्त इमारतीचा स्ट्रक्चर ऑडिट आणि विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याने संबंधित प्रशासनाकडून गेल्या ३ वर्षात जाणीव पूर्वक कानाडोळा होत असल्याने राज्य शासनाची नैतिक जबाबदारी आहे.

विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके व गणवेश उपलब्ध करुन देण्यात राज्य शासन शिक्षणावर मोठ्या प्रमाणावर खर्च करीत आहे,

असे असले तरी विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना त्यांच्या बसण्याची गैरसोय व येणाऱ्या अडीअडचणी बाबत दखल घेण्यात येत नाही.

ग्रामीण व डोंगराळ भागातील गोरगरिब जनतेच्या मुलांचा शैक्षणिक दृष्टिकोनावर राज्य शासनाकडून दुर्लक्ष न करता संबंधित विभागाकडून शाळेच्या इमारतीची चौकशीअंत कारवाई करून विद्यार्थ्यांची बसण्याची गैरसोय दुर करण्याची गरज आहे...

अनेक पालकवर्गाकडुनही आपल्या पाल्यांना खाजगी शाळेत प्रवेश करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेतून नाव कमी केल्याने मुलांची पट संख्या कमी होईल व हळु हळु जिल्हा परिषदेची शाळा बंद होईल, त्यामुळे गोरगरिब जनतेची मुले शिक्षणा पासुन वंचित राहणार नाही याचीही दखल शिक्षण विभाग आणि राज्य शासनाने घेण्याची आवश्यकता आहे.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाहिरा येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**विद्यार्थ्यांचे देशभक्तीपर गीतांवर लेझीम सादरीकरण; गुणवंत विद्यार्थिनींचा ट्रॉफी देऊन सन्मान**



प्रतिनिधी : सोपान पगारे



वाहिरा : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वाहिरा येथे देशभक्तीपूर्ण वातावरणात ०८ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास वाहिरा गावातील ग्रामस्थ बंधू-भगिनी, पालक, विद्यार्थी तसेच ग्रामपंचायत पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाने करण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीताने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व, देशासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान आणि देशाप्रती असलेले आपले कर्तव्य याबाबत मनोगत व्यक्त केले.

यानंतर शाळेतील विद्यार्थिनींनी विविध देशभक्तीपर गीतांवर आकर्षक लेझीम सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या तालावर केलेल्या लेझीमच्या सादरीकरणामुळे संपूर्ण शालेय परिसरात उत्साहाचे आणि देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध व उत्स्फूर्त सादरीकरणाला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा. डॉ. बबनराव झांजे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाबरोबरच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन यश संपादन करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास, जिद्द, सातत्य आणि योग्य नियोजनाच्या माध्यमातून आपल्या शैक्षणिक प्रगतीचे ध्येय निश्चित करावे, असे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून विविध क्षेत्रांत यश मिळवून आपल्या शाळेचे व गावाचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या माजी विद्यार्थिनींचा तसेच नीट (NEET-GEE) परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थिनींचा ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. ग्रामीण भागातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करत या विद्यार्थिनींनी मिळविलेले यश हे इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. त्यांच्या यशामुळे शाळेचे तसेच वाहिरा गावाचे नाव उज्ज्वल झाले असल्याचे गौरवोद्गारही यावेळी काढण्यात आले.

या प्रसंगी सरपंच संभाजी गाडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवींद्र फरतारे, उपसरपंच, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ, पालक, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत पदाधिकारी, पालक व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम संस्मरणीय ठरला.

शेवटी राष्ट्रभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' अशा घोषणांनी कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. उपस्थित विद्यार्थी व ग्रामस्थांना मिठाईचे वाटप करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.व झालेल्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विद्यार्थीनी सादर केलेल्या कार्यक्रमाला सर्व पालकांनी ग्रामस्थांनी शिक्षण प्रेमी नागरिकांनी शाळेसाठी रोख 23200 रुपयांची देणगी दिल्याबद्दल शाळेच्या वतीने खुप खुप आभार तसेच नुतन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री रविंद्र आजिनाथ फरतारे व उपाध्यक्ष श्री अमोल झांजे यांनी शाळेला संपुर्ण 11000रुपये किंमतीचा साऊन्ड सिस्टीम शाळे साठी देण्याचे आश्वासन दीले

# मोदी लर्निंग सेंटर येथे ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर भाषणे, गीते व विविध सांस्कृतिक सादरीकरणातून स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित**



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मोदी लर्निंग सेंटर येथे भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साह, देशभक्ती आणि अभिमानाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरूवात राष्ट्रध्वजारोहणाने झाली. न्यू व्हिजन पब्लिक स्कूलचे प्राचार्य डॉ.पांडुरंग के.पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना देत राष्ट्रगीताचे गायन केले.

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर भाषणे, गीते व विविध सांस्कृतिक सादरीकरणातून स्वातंत्र्य दिनाचा उत्साह द्विगुणित केला. विद्यार्थ्यांच्या निरागस आणि ओजस्वी भाषणांनी उपस्थितांची मने जिंकली. संस्थाध्यक्ष राजकिशोर मोदी, व्यवस्थापकीय संचालक संकेत मोदी, कार्यकारी संचालिका सौ.डिंपल मोदी, मार्गदर्शक प्राचार्य डॉ.बी. आय.खडकभावी, माजी उपप्राचार्य वसंतराव चव्हाण, प्राचार्य विनायक मुंजे, प्रा.राघवेंद्र राजमान्य, मुख्याध्यापक प्रदीप सोनी, समन्वयक रवींद्र राजगुरू, त्रिपाठी जयशंकर, शारदा शिंदे, नितीन घोबाळे, शिल्पा शिंदे, स्नेहल पाटील, सांस्कृतिक विभाग समन्वयक सुचिता दहिफळे तसेच परिपाठ प्रमुख केतेश्वरण यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमास श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळांतर्गत डी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संतोष तरके, प्राचार्य नरेश जयस्वाल, कॉक्सिट महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती तपस्या गुप्ता, श्री जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य चंद्रकांत गायकवाड तसेच संस्थेच्या विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन परिपाठ प्रमुख केतेश्वरण, सांस्कृतिक विभाग समन्वयक सुचिता दहिफळे व शिक्षकवृंद यांनी केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध देशभक्तीपर कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसरात उत्साह आणि राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. 'एकता, शिस्त आणि राष्ट्रप्रेम' या मूल्यांचा संदेश देत स्वातंत्र्य दिनाचा हा सोहळा उत्साहात आणि दिमाखात संपन्न झाला.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, सोमवार, 17 ऑगस्ट 2026


# उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्याकडे नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या ठोस मागण्या

## उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचा सकारात्मक प्रतिसाद

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :**

राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या परळी दौऱ्यादरम्यान परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध महत्त्वपूर्ण मागण्यांचे निवेदन सादर केले. या मागण्यांवर सुनेत्राताई पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, आवश्यक बाबी शासनस्तरावर पाठपुरावा करून मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी यांनी यावेळी ना. सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्यासोबत संवाद साधत स्व. अजितदादा पवार यांचे बीड जिल्ह्यासह विशेषतः परळी वैजनाथ नगरीवर विशेष लक्ष व प्रेम होते असे नमूद केले. त्यांनी परळीच्या विकासासाठी विविध योजना व निधी उपलब्ध करून दिला. त्याच विकासदृष्टीने सुनेत्राताई पवार यांनीही परळीच्या विकासासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.



■ **यात्राकर अनुदानात परळीचा समावेश करण्याची मागणी**

प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगामुळे परळी हे देशभरातील भाविकांचे श्रद्धास्थान आहे. वर्षभर मोठ्या संख्येने भाविक येथे येत असल्याने तीर्थक्षेत्र यात्राकर अनुदानासाठी परळी नगर परिषदेचा समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली. या निधीमुळे स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, प्रकाश व्यवस्था आणि भाविकांसाठीच्या सुविधांना बळकटी मिळणार आहे.

■ **अत्याधुनिक अग्निशमन वाहनाची मागणी**

परळी शहराचा वाढता विस्तार व लोकसंख्या तसेच औद्योगिक क्षेत्राचा विचार करता नगर परिषदेची अग्निशमन यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालयामार्फत अत्याधुनिक अग्निशमन वाहन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली.



■ **जलालपूर भागातील रस्त्यांसाठी रेल्वे अंडरपास**

परळी-बीड-अहिल्यानगर रेल्वे मार्गामुळे जलालपूर भागातील प्रस्तावित १८ मीटर व ३० मीटर रस्त्यांच्या वाहतुकीवर परिणाम होणार आहे. भविष्यातील वाहतूक कोंडी व नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी या दोन्ही रस्त्यांवर रेल्वे अंडरपास उभारण्याची मागणी करण्यात आली.

■ **वाढीव ७५ कोटींच्या पाणीपुरवठा योजनेला मंजुरी**

परळी शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन वाढीव ७५ कोटी रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेस तातडीने प्रशासकीय मंजुरी द्यावी, अशी मागणी करण्यात आली. या योजनेमुळे नागरिकांना नियमित व शाश्वत पाणीपुरवठा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

■ **नगर परिषदेतील २९ रिक्त पदे भरण्याची मागणी**

नगर परिषदेमधील राज्य संवर्गातील १४ तसेच आस्थापनेवरील १५ अशी एकूण २९ पदे रिक्त आहेत. मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत असल्याने ही सर्व पदे तातडीने भरण्याची मागणी करण्यात आली.

■ **अल्पसंख्यांक बहुल भागासाठी १० कोटींची विशेष योजना**

परळी शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागातील मूलभूत नागरी सुविधा सक्षम करण्यासाठी अल्पसंख्यांक विभागामार्फत १० कोटी रुपयांची विशेष नागरी सुविधा योजना मंजूर करावी, अशी मागणीही करण्यात आली. या निधीतून रस्ते, नाल्या, पथदिवे, पाणीपुरवठा आदी सुविधांचा विकास करता येणार आहे. या सर्व मागण्यांची दखल घेत सुनेत्राताई पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, परळी शहराच्या विकासासाठी आवश्यक त्या बाबी शासनस्तरावर पाठपुरावा करून मार्गी लावण्याचे आश्वासन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांना दिले.

---

# गोपाला फाऊंडेशन, तुळजाभवानी मल्टीस्टेट व उपजिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या वतिने पोहनेर मध्ये सामाजिक उपक्रम

**सिरसाळा/ अतुल बडे**

गोपाला फाऊंडेशन महाराष्ट्र,तुळजाभवानी मल्टीस्टेट शाखा सिरसाळा व छत्रपती संभाजीनगर येथील कार्यरत उपजिल्हाधिकारी पोहनेर चे भूमीपुत्र श्रीकांत देशपांडे यांच्या वतिने १५ ऑगस्ट ,भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या औचित्याने पोहनेर मध्ये सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आले होते. गोपाला फाऊंडेशन महाराष्ट्र व छत्रपती संभाजीनगर उपजिल्हाधिकारी श्रीकांत देशपांडे यांच्या वतिने जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य स्कूल बॅग,वह्या , पेन वाटप करण्यात आले आहेत. तर तुळजाभवानी मल्टीस्टेट शाखा सिरसाळा वतिने पोहनेर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शेकडो वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले आहे.



दरम्यान परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या मुख्याध्यापक पदी अरविंद काकडे यांची नियुक्ती झाल्याबद्दल उपसरपंच विशाल श्रीरंग यांनी त्यांचा भव्य सत्कार व सन्मान केला .सामाजिक उपक्रम कार्यक्रम दरम्यान ॲड पवन निकम,संतोष खराटे,कृष्णा शिंदे , डॉक्टर राहूल शिंदे, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अरविंद काकडे, माध्यमिक चे मुख्याध्यापक राजूरकर सर, तसेच रामेश्वरजी शिंदे, चेअरमन दिपक खोसे , उपसरपंच विशाल श्रीरंग,सरपंच फारुक भाई कुरेशी, कोंडीराम पावर, पत्रकार मिलिंद चोपडे, फारुक भाई मोईन कुरेशी,विष्णू रोडगे,महेश खोसे, पत्रकार बालाजी काळे , दयानंद गोरे,मदन काकडे,रामेश्वर काकडे,बापू काकडे,पमा काकडे,रामेश्वर खामकर,हारुन भाई कुरेशी,भैय्या स्वामी,माणिक लाकडे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी, शाळेतील शिक्षक कर्मचारी आदीसह शेकडो पोहनेर ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

---

# परळी औष्णिक विद्युत केंद्रात भारताचा 80 वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या झाले हस्ते ध्वजारोहन !

**परळी /प्रतिनिधी**

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त दि १५ आगष्ट २०२६ रोजी देशाचा स्वतंत्र दिन मोठया हर्ष उल्हासात परळी औष्णिक विद्युत केंद्रात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मुख्य अभियंता सुनील इंगळे यांच्या हस्ते सकाळी ध्वजारोहन करण्यात आले.

यावेळी उपमुख्य अभियंता महेश महाजन, प्रभारी उपमुख्य अभियंता(प्रशासक) हिम्मतराव अवचार, अधीक्षक अभियंता एस. एन. बुकतारे, अधीक्षक अभियंता राजीव रेड्डी, कार्यकारी अभियंता पंकज दगडे, शीलरत्न मेश्राम , सुरक्षा अधिकारी वरिष्ठ



व्यवस्थापक बी आर अंबड, कल्याण अधिकारी शरद राठोड,अरुण गित्ते आर्दीची उपस्थिती होती.

औष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य कार्यालयावर तिरंगा ध्वज फडकविण्यात आला.

तसेच क्रीडा संकुल येथे मुख्य अभियंता डॉ. सुनील इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत विविध उपक्रमाने देशाचा स्वतंत्र दिन साजरा करण्यात आला.

---

# बीडच्या संत सावता महाराज मंदिराच्या सभागृहासाठी भरीव निधी देणार

## ना.पंकजाताई मुंडे यांची ग्वाही; माळी समाज बांधवांनी केला हृदय सत्कार

**बीड | प्रतिनिधी**

बीडमधील संत सावता महाराज मंदिर परिसरातील सभागृह, भव्य डोम तसेच आवश्यक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन टप्प्यात भरीव निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज येथे दिली.

बीड शहरातील संत सावता महाराज मंदिरात ट्रस्टकडून ना.पंकजाताई मुंडे यांचा रविवारी (दि.१६) सत्कार करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर, बीड नगरपरिषदेच्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, नगरसेवक शुभम धूत, सावित्री नितीन साखरे, ट्रस्टचे पदाधिकारी नामदेव दुधाळ, मोहन गोरे, शामसुंदर घाडगे, समता परिषद जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, शहराध्यक्ष नितीन राऊत, महात्मा फुले युवा दलाचे अध्यक्ष ॲड. सतीश शिंदे, दिनकर जमदाडे, सिताराम पानखडे, सचिन दुधाळ, रमेश दुधाळ, विष्णू यादव, महेश राऊत, बाळासाहेब धोत्रे, मंगेश जमदाडे, महेश चौधरे, संतोष गवळी, सुबोध शिंदे, छाया लांडगे, अलका राऊत, चित्रा घाडगे, आशा गोरे, मंदा राऊत, प्रियांका गोरे आदी उपस्थित होते.





पुढे बोलताना ना.पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, संत सावता महाराज मंदिराची पायाभरणी सुरू असताना आपण या ठिकाणी आले होते. मंदिरासाठीची जागा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी उपलब्ध करून दिली. आता मंदिर परिसराच्या विकासासाठी डॉ.योगेश क्षीरसागर हे पाठपुरावा करत आहेत. त्यांच्यासह सहकाऱ्यांनी भव्य डोमच्या बांधकामासह विविध सुविधांसाठी भरीव निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. समाजाची मागणी आणि मंदिर परिसराच्या विकासाची गरज लक्षात घेऊन जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन टप्प्यांत भरीव निधीची तरतूद करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. संत सावता महाराज मंदिर परिसराच्या विकासामुळे भाविकांसह समाजबांधवांना विविध सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार असून, समाजपयोगी उपक्रमांसाठी सभागृह उपयुक्त ठरणार आहे, असेही त्या म्हणाल्या. यावेळी विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

■ **डॉ.क्षीरसागरांसह पदाधिकाऱ्यांनी मुंबईत भेटून दिले होते आमंत्रण**

भाजप नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी काही दिवसांपूर्वी मुंबईत मंत्री पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन बीड शहरातील संत सावता महाराज मंदिराला भेट देण्याचे आमंत्रण दिले होते. त्यानुसार पंकजाताई मुंडे यांनी मंदिराला भेट देऊन सत्कार स्वीकारला. तसेच मंदिर परिसराच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.